# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(CIN:U40109MH200SSGC153645)

महाव्यवस्थापक (मासं-व्य.प्र.)
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड,बांद्रा, ( पूर्व ),
मुंबई - ४०००५१.

दुरध्वनी क्र. : ०२२२६४७५७५६
वि.क्र. : २२१६
Email : gmhr_hrms@mahadiscom.in


क्र.महा.व्य. (मासं-व्य.प्र.)/ No 01489 दिनांक : 15 JAN 2019

परिपत्रक

विषय :- महावितरण मधील सर्व कर्मचाऱ्यांचे बँक खाते क्रमांक अद्ययावत करणे बाबत.

-----------------

महावितरण मधील कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन आणि वेतना व्यतिरिक्त सर्व देयके प्रणालीतून करणे बाबत संचालक (वित्त) यांचे परिपत्रक क्र. ३१८७५ दि. ३०.१०.२००९ आणि क्र. ५३४ दि. २०.०२.२०१७ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व कर्मचाऱ्यांचे बँक खाते क्र., IFSC Code आणि MICR Code मानव संसाधन व्यवस्थापन प्रणली मध्ये अद्ययावत करण्यात आली आहे. सध्या कर्मचारी यांचे कार्यालय - निहाय पगार पत्रक पूर्ण करुन कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर देयके बँकेत जमा करण्यात येतात.

सदयस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांचे पगार पत्रक कार्यालय निहाय तयार होऊन त्याच कार्यालयातून वेतन अदा होते, मात्र इथुन पुढे सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन आणि वेतना व्यतिरिक्त सर्व देयके यांची तयार करण्याची प्रक्रिया ही संबधित कार्यालयात पूर्ण करुन वेतन आणि देयके याची रक्कम मुख्य कार्यालय, मुंबई येथून अदा करावे असे निर्देश आहेत.

उपरोक्त बाब विचारात घेऊन सर्व अधिकारी /कर्मचारी यांनी आपली बँकेशी संबधीत सर्व माहिती (बँकेचे नाव, बँक शाखेचे नाव, बँक खाते क्रमांक, IFSC Code आणि MICR Code) Employee Portal (Personal Profile => Profile) मधून दि. ०१.०२.२०१९ पूर्वी तपासून घ्यावी व त्यात काही बदल असल्यास Employee Portal (Application => change in Personal details) मधून सादर करावी. बँक खात्यामध्ये झालेला बदल संबंधीत कार्यालयास कळविण्याची व कागदपत्रे सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी कर्मचाऱ्याची असेल.

कर्मचाऱ्याला बँक खात्याच्या संबंधी काही बदल करावयाचा असल्यास संबधीत माहिती ही महिन्याच्या १ ते २० तारखेपर्यंत प्रणालीतून सादर करता येईल.

सदर परिपत्रक हे PAPDRP Portal तसेच Employee Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(चंद्रशेखर येरमे)
कार्यकारी संचालक (मासं)

Scanned by CamScanner